Prepp
Your Personal Exams Guide

# UGC NET PAPER 2 NOVEMBER 05, 2017 SHIFT 1 MARATHI QUESTION PAPER

MARATHI

मराठी

PAPER - II

प्रश्नपत्रिका – II

**Note :** This paper contains fifty (50) objective type questions of two (2) marks each. All questions are **compulsory**.

**सूचना :** ह्या प्रश्न पत्रिकेत पन्नास (50) बहु-पर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नासाठी दोन (2) अंक आहेत. **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.

1. भाषेची द्विस्तरीय रचना, निर्मितिशीलता, यादृच्छिकता, विनिमयपद्धती, विशिष्टता, स्थलकालातितता व सांस्कृतिक संक्रमण ही भाषेची सात लक्षणे कोणी सांगितली ?

   (1) लेनर्ड ब्लूमफिल्ड  (2) चार्लस् हॉकेट

   (3) एडवर्ड सपीर  (4) रॉबर्ट हॉल

2. स्वनिमांचे लेखन करीत असताना :

   (1) स्वनान्तरे चौकोनी कंसात ( [ ] ) लिहितात, तर स्वनिम तिरप्या रेषेत (इटॅलिक) दाखवितात.

   (2) अर्थनिर्णायक क्षमता स्पष्ट करतात.

   (3) आंशिक विचारसाम्य ध्वनींचा वर्ग दाखवितात.

   (4) भिन्न बोलींची दर्शकता स्पष्ट करतात.

3. 'माझ्या परोक्ष त्याने माझी संपत्ती मिळवून दिली'. – या वाक्याचा अर्थ – मला नकळत त्याने माझी संपत्ती मिळवून दिली– असा स्पष्ट होत असल्यास, त्या प्रकारच्या अर्थास काय म्हणतात ?

   (1) साहचर्यपर अर्थ  (2) परावर्तित अर्थ

   (3) शैलीगत अर्थ  (4) भावपर अर्थ

4. बोलीशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी वांशिक अर्थमीमांसा करावी लागते तसेच सामाजिक परिमाणांच्या ऐवजी भौगोलिक सीमारेषा निश्चित कराव्या लागतात.

   (1) संपूर्ण विधान चूक  (2) संपूर्ण विधान बरोबर

   (3) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर  (4) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

5. मध्ययुगीन मराठीचे रूप काही बाबतीत जाणवण्याइतके परिवर्तीत झाले आहे. नामांची रूपे प्राचीन मराठीत 'उ' कारान्त व 'ओ' कारान्त होत होती. ती मध्ययुगीन मराठीत 'अ' कारान्त होऊ लागली. या लक्षणीय परिवर्तनाचा आरंभ :
   (1) 'उखाहरण' मध्ये आढळतो. (2) समर्थ रामदासांच्या काव्यात आढळतो.
   (3) मुक्तेश्वरांच्या काव्याविष्कारात आढळतो. (4) शके १०७३ च्या चिकुर्डे ताम्रपटात आढळतो.

6. 'अक्षीचा शिलालेख' हा पहिल्या नव्हे तर दुसऱ्या केशिदेव शिलाहाराचा असून त्याचा काळ शके 1131 आहे, हे मत कोणाचे ?
   (1) वा. वि. मिराशी (2) विश्वनाथ काशीनाथ राजवाडे
   (3) विठ्ठल बाबू प्रभुदेसाई (4) चिं. ग. कर्वे

7. पुढीलपैकी कोणता शब्द लेखनविषयक नियमानुसार लिहिला आहे ?
   (1) आळंदीमहात्म्य (2) आळंदीमाहात्म्य
   (3) आळंदिमाहात्म्य (4) आळंदिमहात्म्य

8. इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनी इसवी सन १६२८, १६७७, व १७२७ या तीन वर्षांतील नमुना कागदपत्रांची पाहणी करून तत्कालीन भाषेतील मराठी शब्दांचे प्रमाण पुढीलप्रमाणे दाखवून दिले. त्या प्रमाणात फार्सी शब्दांचे प्रमाण कळते.
   (1) १४%, ६२% व ९८% (2) २८%, २६% व ८९%
   (3) ४२%, ६२% व ९८% (4) १४%, २५% व ७५%

9. (इमारत् >) इमारत, (जिन्स् >) जिन्नस, (दाखिल >) देखील, (जव्हर >) जवाहीर ही रूपे मराठीत आली, ती कोणत्या भाषेमुळे ?
   (1) अरबी (2) उर्दू (3) फार्सी (4) तुर्की

10. शब्दादान, रूपान्तरादान, भाषान्तरदान हे पुढीलपैकी कोणत्या प्रकारांतील प्रक्रिया होत ?
   (1) वस्तुरूपान्तर प्रक्रिया (2) आदान प्रक्रिया
   (3) सांस्कृतिक आदान प्रक्रिया (4) व्याकरणादान

11. "भटो : तुम्ही निरंतर काइसयाचें मनन करीत असा :" असा प्रश्न नागदेवाचार्यांना कोणी विचारला ?
   (1) महदाइसा (2) म्हाइंभट (3) लक्ष्मींद्रभट (4) केशिराजव्यास

12. महानुभाव संप्रदायाचे आम्नाय किती ?
   (1) 5 (2) 10 (3) 12 (4) 13

13. 'तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल। देव विठ्ठल देवपूजा विठ्ठल।' हा अभंगचरण कोणाचा ?

(1) ज्ञानदेव (2) नामदेव (3) मुक्ताबाई (4) चोखामेळा

14. 'सिद्धान्तबोध' हा काव्यग्रंथ कोणाचा ?

(1) शेख महंमद (2) शहा मुन्तोजी (3) शहामुनी (4) चांद बोधले

15. बखरींचा उपयोग इतिहासलेखनात होतो, इतकेच नाही, तर ते अग्रक्रमाने इतिहासाचे अव्वल साधन मानले जाते.

(1) संपूर्ण विधान बरोबर
(2) संपूर्ण विधान चूक
(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(4) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

16. 'घडि घडि अरे मनमोहना' ही लावणी कोणाची ?

(1) प्रभाकर (2) होनाजी (3) अनंत फंदी (4) राम जोशी

17. 'अंबरहुसेनी' ही कोणत्या ग्रंथावरील टीका होय ?

(1) अमृतानुभव
(2) चतु:श्लोकी भागवत
(3) गीता
(4) आर्याभारत

18. स्तोत्र आणि स्तोत्रकार यांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | मूर्तिवर्णनस्तोत्र | (i) | खळ्ळेव्यास |
| (b) | गद्यराजस्तोत्र | (ii) | पंडित भीष्माचार्य |
| (c) | मार्गमंजरीस्तोत्र | (iii) | कवीश्वराचार्य |
| (d) | संकटहरणस्तोत्र | (iv) | हयग्रीवाचार्य |
| | | (v) | पंडित दामोदरमुनी |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (ii) | (v) |
| (2) | (iv) | (i) | (v) | (ii) |
| (3) | (v) | (ii) | (i) | (iv) |
| (4) | (i) | (iii) | (iv) | (ii) |

Prepp
Your Personal Exams Guide

19. 'ऐतिह्य प्रतिभेचा कवी' म्हणून मुक्तेश्वराचा गौरव कोणी केला ?

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | कृष्णशास्त्री चिपळूणकर | (2) | वि. ल. भावे |
| (3) | वि. का. राजवाडे | (4) | बा. अ. भिडे |

20. "शत जन्म शोधताना" या नाट्यपदाचा कर्ता कोण ?

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | शंकर बाळाजी शास्त्री | (2) | विनायक दामोदर सावरकर |
| (3) | गोविन्द बल्लाळ देवल | (4) | कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर |

21. 'अवध्य' नाटकाचा लेखक कोण ?

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | जयवंत दळवी | (2) | बाळ कोल्हटकर |
| (3) | चिं. त्र्यं. खानोलकर | (4) | विजय तेंडुलकर |

22. पु. ल. देशपांडे यांनी आपल्या कोणत्या नाटकाच्या पुस्तकात इंग्रजी आशावादी कवी रॉबर्ट ब्राऊनिंग यांचा संदर्भ घेतला ?

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | तुझे आहे तुजपाशी | (2) | सुंदर मी होणार |
| (3) | तीन पैशांचा तमाशा | (4) | ती फुलराणी |

23. आद्य लघुकथाकार म्हणून कोण प्रसिद्धीस आले ?

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | वामन चोरघडे | (2) | आनंद यादव |
| (3) | कॅ. गो. गं. लिमये | (4) | जी. ए. कुलकर्णी |

24. मातृविषयक कविता व कवी यांच्या जोड्या लावा –

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | प्रेमस्वरूप आई ..... | (i) | ना. घ. देशपांडे |
| (b) | आई म्हणोनि कोणी ..... | (ii) | ग्रेस |
| (c) | ती आई होती म्हणुनी ..... | (iii) | यशवंत |
| (d) | कुठे लोपली माय माझी ..... | (iv) | माधव जूलियन |
| | | (v) | फ. मुं. शिंदे |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (v) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (ii) | (i) | (iv) | (iii) |

Prepp
Your Personal Exams Guide

25. पुढीलपैकी कोण विज्ञान नाटककार आहेत ?

(1) जयंत नारळीकर
(2) सुबोध जावडेकर
(3) ज. रा. फणसळकर
(4) निरंजन घाटे

26. 'हं हं आणि हंहंहं' या बालनाटकाचे लेखक कोण ?

(1) भालबा केळकर
(2) दिनकर देशपांडे
(3) युधिष्ठिर जोशी
(4) विजय तेंडुलकर

27. समीक्षक व समीक्षाग्रंथ यांच्या जोड्या लावा –

(a) द. भि. कुलकर्णी
(b) म. वा. धोंड
(c) रा. भा. पाटणकर
(d) धों. वि. देशपांडे

(i) जी. एं. ची कथा : एक अन्वयार्थ
(ii) मुक्तिबोधांचे साहित्य
(iii) पार्थिवतेचे उदयास्त
(iv) तरीहि येतो वास फुलांना
(v) धुके आणि शिल्प

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (v) | (i) | (ii) | (iii) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (i) | (v) | (iv) | (ii) |
| (4) | (iii) | (iv) | (ii) | (i) |

28. 'वळीव' ही गाजलेली ग्रामीण कथा कोणी लिहिली ?

(1) व्यंकटेश माडगूळकर
(2) शंकर पाटील
(3) द. मा. मिरासदार
(4) आनंद यादव

29. कादंबरी व कादंबरीकार यांच्या जोड्या जुळवा :

(a) नवा संसार
(b) प्रतिज्ञा
(c) सुकलेले फूल
(d) हिरवा चाफा

(i) ना. सी. फडके
(ii) वि. स. खांडेकर
(iii) ग. त्र्यं. माडखोलकर
(iv) पु. य. देशपांडे
(v) वा. म. जोशी

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (v) | (i) | (iii) |
| (2) | (i) | (iii) | (ii) | (v) |
| (3) | (v) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (iii) | (i) | (iv) | (ii) |

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

30. 'अख्येर अधिकार' या मूळ बंगाली भाषेतील पण मराठीत अनुवादित झालेल्या कादंबरीचे अनुवादक कोण?

(1) मृणालिनी केळकर (2) सरोजिनी कमतनूरकर
(3) इंदुमती शेवडे (4) प्रभा श्रीनिवास

31. संस्कृत भाषेतील 'सिंहासनबत्तिशी' मराठीत कोणी अनुवादित केली?

(1) श्रीपाद जोशी (2) का. अ. जोशी (3) स. आ. जोगळेकर (4) गं. ना. जोगळेकर

32. पुढीलपैकी अमृता प्रीतम ह्यांच्या कोणत्या कादंबरीचा मराठी अनुवाद हेमा जावडेकर यांनी केला आहे?

(1) बंद दरवाजा (2) ना राधा, ना रुक्मिणी (3) कोरे कागद (4) तेरावा सूर्य

33. 'रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारे शब्दार्थ म्हणजे काव्य' – ही व्याख्या कोणाची?

(1) भामह (2) दण्डी (3) कुंतक (4) जगन्नाथ

34. उत्पन्न झालेल्या चित्तवृत्तीचे नाटक पाहताना जाणवणारे परिणाम म्हणजे –

(1) विभाव (2) व्यभिचारीभाव (3) अनुभाव (4) स्थायीभाव

35. भारतीय साहित्यशास्त्रकार आणि त्यांचा कालखंड यांच्या जोड्या जुळवा.

(a) वामन (i) नवव्या शतकाचा प्रारंभ
(b) दण्डी (ii) अकराव्या शतकाचा पूर्वार्ध
(c) कुंतक (iii) आठव्या शतकाचा उत्तरार्ध
(d) आनंदवर्धन (iv) सातव्या शतकाचा प्रारंभ
(v) पाचव्या शतकाचा उत्तरार्ध

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (v) | (iii) | (ii) |
| (2) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (3) | (i) | (iii) | (iv) | (v) |
| (4) | (v) | (ii) | (iii) | (iv) |

36. लौकिक विषय काव्याच्या क्षेत्रात येताच अलौकिक बनतात ते कशाने?

(1) अभ्यास (2) चिकाटी (3) प्रज्ञा (4) प्रतिभा

Prepp
Your Personal Exams Guide

37. अनुकरणशीलता, पारंपरिकता आणि प्रमाणबद्धता ही साहित्यातील कोणत्या संप्रदायाची वैशिष्ट्ये होत ?

(1) स्वच्छंदतावाद (2) अभिजातवाद (3) वास्तववाद (4) अस्तित्ववाद

38. पुढीलपैकी कोणत्या ग्रंथाने मार्क्सवादी समीक्षाविचार महाराष्ट्राला प्रथम परिचय करून दिला ?

(1) साहित्य आणि समाजजीवन

(2) महाराष्ट्रीय संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य

(3) नवी मूल्ये

(4) संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुति

39. मर्ढेकर हे मराठीतील महत्त्वाचे कलावादी समीक्षक असले, तरी ललित लेखक म्हणून मर्ढेकर जीवनवादीच ठरतात.

(1) संपूर्ण विधान बरोबर (2) संपूर्ण विधान चूक

(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (4) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

40. समधाततेचा सिद्धान्त कोणी मांडला ?

(1) मॅथ्यु अर्नोल्ड (2) टी. एस. एलियट (3) आय. ए. रिचर्डस् (4) मार्टिन हायडेगर

41. प्लेटोने कोणत्या ग्रंथात कवी व काव्यविषयक भूमिका मांडली आहे ?

(1) सिंपोझियम (2) रिपब्लीक (3) फेड्रस (4) ॲपॉलाजी

42. 'पासंग' हा समीक्षाग्रंथ कोणाचा ?

(1) द. ग. गोडसे (2) माधव आचवल (3) कुसुमावती देशपांडे (4) पु. शि. रेगे

43. 'मागून', 'दिवसाचा', 'अथपासून', 'उद्यापर्यन्त' यांचा पुढीलपैकी शब्दप्रकार कोणता ?

(1) क्रियाविशेषण (2) विशेषण (3) क्रियापद (4) नाम

44. आख्यातार्थ व्यक्त करण्याचे कार्य जसे प्रत्यय करतात, तसे कार्य संयुक्त क्रियापदासारखे शब्द ही करतात.

(1) संपूर्ण विधान चूक

(2) संपूर्ण विधान बरोबर

(3) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(4) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

45. क्रियापदाच्या कर्ता व कर्म या दोन कारकांच्या लिंग-वचनानुसार, तसेच पुरुषानुसारही, आकाराला येणारे रूप म्हणजे प्रयोग, असे मानले तरी ते कधी कर्त्याला व कधी कर्माला तसेच कधी स्वत:लाही अनुसरते.

(1) संपूर्ण विधान चूक
(2) संपूर्ण विधान बरोबर
(3) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
(4) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

46. व्याकरणविषयक विचार व वैयाकरणी यांच्या सार्थक जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | आख्यात् ही संज्ञा | (i) | कृष्णशास्त्री चिपळूणकर |
| (b) | 'संमत' ही संकल्पना | (ii) | विश्वनाथ खैरे |
| (c) | 'शब्दशास्त्र' | (iii) | म. पां. सबनीस |
| (d) | बोलण्याची भाषा प्रमुख व लेखनाची दुय्यम | (iv) | दादोबा पांडुरंग |
| | | (v) | अरविंद मंगरुळकर |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (v) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (i) | (iii) | (iv) | (v) |
| (4) | (i) | (iii) | (v) | (iv) |

47. 'धिक्क', 'इश्श्', 'धुत्' – हे पुढीलपैकी कोणत्या केवल प्रयोगाशी संबंधित आहेत ?

(1) आश्चर्यद्योतक
(2) तिरस्कारद्योतक
(3) उद्वेगद्योतक
(4) विरोधद्योतक

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

48. आकाशवाणीवरील जाहिरातीत निवेदनाचे प्रभावी चढउतार असतात, तरीदेखील दूरदर्शनवरील जाहिराती आकाशवाणीवरील जाहिरातीपेक्षा अधिक प्रभावी ठरतात.

(1) संपूर्ण विधान बरोबर

(2) संपूर्ण विधान चूक

(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(4) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

49. वृत्तपत्रातील बातम्या आकाशवाणी व दूरदर्शनच्या बातम्यांपेक्षा अधिक काळ स्मरणात राहातात कारण –

(1) वाचनाची लोकांना आवड असते.

(2) वृत्तपत्रातील बातमी गरजेनुसार वाचता येते.

(3) वृत्तपत्र इतर माध्यमांपेक्षा सोबत वागवता येते.

(4) वृत्तपत्रातील बातमीची आकर्षक मांडणी वारंवार पाहता येते.

50. पूरक मथळा म्हणजे –

(1) मथळ्याचा स्पष्टीकरणात्मक भाग होय.

(2) मथळ्याच्या संदिग्ध संकल्पनांचा विस्तार होय.

(3) मथळ्याच्या जाणीवपूर्वक विस्तारीकरणाची प्रक्रिया होय.

(4) मथळ्याच्या अनुषंगाने बातमीची परिणामकारकता पटवून देणे होय.

- o 0 o -

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Space For Rough Work

Prepp
Your Personal Exams Guide

Space For Rough Work